REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# नारायण सुर्वेंची माणुसकीची कळ जपणारी सामाजिक कविता



डॉ. राजेंद्र खंदारे
सहयोगी प्राध्यापक , सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय,
नातेपुते ता. माळशिरस जि-सोलापूर.

## प्रस्तावना :

**"एकटाच आलो नाही युगाचीही साथ आहे; सावध असा तुफानाची हीच सुरुवात आहे; कामगार आहे मी तळपती तलवार आहे; सारस्वतानो थोडासा मी गुन्हा करणार आहे."** असे म्हणत मार्क्सवादाला हाताशी धरून मराठी कवितेला मराठी कवितेला स्वप्नरंजनातून वास्तवादी बनविण्याचे काम नारायण सुर्वेनी केले.

नारायण सुर्वे ज्या कामगार वस्तीमध्ये वाढले त्या कामगार वस्तीतूनच त्यांची घडवणुक झाली. कार्यकर्ता विचारवंत, कवी, आणि त्यांचा सृजनशील आत्मा याच बकाल समजल्या गेलेल्या कामगार वस्तीमध्येच उभा राहिला. अशा या कामगार जगताविषयी ते म्हणतात, " दु:खाने ती गांगरत, परंतु क्षणात स्वत:ला सावरत. श्रम विकणारी ही दुनिया असल्यामुळे एकोपा निर्माण होई. दु:खाला खांदेकरी इथे मिळत. सुखाचे सोबती सगळेच असत. दु:ख वाटून घेणे हे या वस्तीला सवयीने चांगले माहीत झाले होते. इथली माणसे लढ्याला भीत नाहीत. प्रखरपणे प्रतिकार करणे हा इथला धर्म होता. प्रतिकार हा इथला मानदंड आहे.विशेष म्हणजे या वस्त्या जागरूक आणि निर्मितीक्षम आहेत." त्यांनीच लिहिलेल्या काव्यपंगतीतून ते लिलितात,"**इथले शौर्य वर्णाया मजपाशी शब्दखाणी नाहीत बाप्पा ! अवघ्या सारस्वतीने तीर्थ घ्यावे असे पावित्र्य ह्या चौकात.** जीवनवादी कवी, लोकाभिमुख कवी अशा विविध बिरुदावल्या त्यांना लावल्या जातात हे त्याच्या कवितेचे वेगळेपण आणि विशेषामुळेच होय. त्यांनी लोकमानसाची भाषेचा अधिकाधिक उपयोग केलेला आहे. ते कवितेचे वेगळेपण सांताना म्हणतात, **'माझी कविता केवळ माणसासाठीच आहे. लढून समाज बदलणाऱ्यासाठी आहे.'** याचाच अर्थ माणसावर प्रचंड विश्वास ठेवणारी त्यांची कविता आहे असे म्हणता येईल.

नारायण सुर्वे हे स्वतः कामगार असल्याने जसा जगत आहे मी तसा शब्दात आहे असे मोठ्या अभिमानाने म्हणू शकले. नारयण सुर्वे हे साम्यवादी असल्याने त्यांच्या कवितेत ही जाणीव शोधावी लागत नाही. 'ऐसा गा मी ब्रह्म' १९६२ मध्ये पहिल्या काव्यसंग्रहातील बहुसंख्य कविता ह्या ह्याच जाणिवेनी व्यापली आहे. आपण सुर्यकुलातील आहोत ही त्यांना कायम जाणीव असते. 'मी' आणि 'आम्ही' यामध्ये फारसा फरक सुर्वे उरू देत नाहीत. सुर्वेनी अंधपणाने या जाणिवा स्वीकारल्या नाहीत.

शोषितांच्या जीवनावर प्रभाव गाजविणाऱ्या विचारांचे उगमस्थान, एक मुक्तीस्थान म्हणून मार्क्सचा विचार नारायण सुर्वे करताना दिसतात[१] त्याचबरोबर मार्क्सच्या गटेप्रेमाचा उल्लेख करून आर्थिक विचारापलिकडे असलेल्या मार्क्सच्या सौंदर्यसक्तीचा ते वेध घेतात.

मार्क्सवादी जाणीव सुर्व्यांच्या विचारांना आणि अवलोकनाला दारुण भूतकाळ आणि विषम प्राप्तकाल त्यांचे संपूर्ण निखंदन करण्यासाठी चाललेला संघर्ष आणि भविष्याची पाहिलेली स्वप्ने या त्रिमितीत बद्ध करते. साम्यवादी

विचारधारा स्वीकारली की अशा आशयव्यूहाला सामोरे जाण्यावाचून गत्यंतरच नसते. पण हा आशयव्यूह ते कसा स्वीकारतात, कसा राबवतात आणि त्यापलीकडे ते डोकावून पाहू शकतात की नाही, आपले कलास्वतंत्र्य अबाधित राखून स्वप्न आणि वास्तवाच्या मर्यादा ते ओळखतात की हे शोधणे महत्वाचे ठरते.

## माणुसकीची कळ जपणारी कविता :

जीवनाचे शाहीर नारायण सुर्वे ह्यानी आपल्या खडतर जीवनातील वेदनेचा वेद करुन त्यांनी श्रेष्ठ काव्याची गुढी उभारली. सुर्वे यांची कविता आत्मनिवेदनी आहे. त्याच्या जीवनाच्या संगतीने वाढलेली कविता आहे. कामगराचे जीवन मुंबईत सुर्वे यांनी प्रत्यक्ष अनुभवले आहे. त्याच जीवनाचे अत्यंत वास्तव आणि जिवंत चित्र ते रेखाटतात. आयुष्य जगणे हीच मोठी समस्या होऊन बसली आहे. अशा या विपरित स्थितीत आपल्या जिद्दी मनोवृत्तीने, लढाऊ वृत्तीची, नव्या युगाच्या क्रांतीची स्वप्ने पाहणारी, अत्यंत प्रामाणिक, भावोत्कट आत्मलक्षी कविता सुर्वे यांनी लिहीली.[१]

कष्टकरी-श्रमिकांच्या विश्वातील अनुभव, त्यांच्याच जीवनातील प्रतिमांमधून व्यक्त करणारी त्यांची कविता, एकूण मराठी काव्य विश्वात आपल्या वेगळेपणाने उठून दिसते. सुर्वे ह्यांची कविता लढाऊ वृत्तीने, कणखर मनाने, समाजक्रांतीची जोपासना करणारी आहे. अनुभवाशी सतत इमान राखून, नव्या जगाची स्वप्ने, मुंबईकर कामगारांच्या बोलीभाषेत सुर्वे सांगतात. कणखर आशावाद आणि तेजाळ ओजोगुण ही त्यांच्या शैलीची खास वैशिष्ट्ये आहेत.

नारायण सुर्वे यांच्या कवितेबद्दल डॉ. एस् एस् भोसले म्हणतात – " झंझावातातही, पदराखाली पणती सांभाळून चालण्यात सुर्वे यांच्या कवितेला आनंद आहे.[२] परिणामतः नारायण सुर्वे यांची कविता खास करुन त्यांची आहे. मात्र ती सुर्वे या व्यक्तीची नसून सुर्वे यांच्या रुपात सामावलेल्या, समाजमनाची प्रतिनिधीरुप कविता आहे. सुर्वे आयुष्यातील नव्या जुन्या अनुभवाला सामोरे होऊन जगले. रुख्यासुख्या वृत्तीने न चालता, जीवनाचे हाडाचे प्रेमिक म्हणून चालत राहिले. जीवनाला तिढा देऊन, त्यावर स्वार झाले आणि त्या मधील आर्त स्पंदनाची बिनचूक नोंद करीत गेले.

सुर्वे यांनी मराठी कवितेला प्रखर वास्तवाची नवी दीक्षा दिली. कामगार आणि दलित-पीडित यांच्या जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याने त्यांच्या कवितेत सामाजिक क्रांतीचा उद्घोष आढळतो. वृत्तीने ते जसे झुंजार आहेत, तसेच मानवी जीवनावरील अपार श्रद्धेमुळे ते आशावादीही आहेत. दलित-पीडित व कामगारांचे जीवन, त्यांच्याच प्रतिमांतून व भाषेतून ते निर्भपणे व्यक्त करीत असल्यामुळे, त्यांची कविता वेगळी वाटते आणि ती उठून दिसते. त्यांच्या कवितेत कणखर आशावाद व ओजोगुण प्रकर्षाने आढळतात. सुर्वे ह्यांनी मराठी कवितेत क्रांतीयुगाची म्हणजेच "सुर्ययुगाची सुरुवात" केली आहे असे त्यांच्या कवितेविषयी म्हटले गेले.

श्री. नारायण सुर्वे यांच्या किवतेला 'स्वानुभूत वासाचे दान' लाभले आहे. केशवसूत, मर्ढेकर यांच्यानंतर मराठी कवितेला वळण देण्याचे काम सुर्वे यांच्या कवितेने केले आहे. वैयक्तिक सुखदु:खाचा परिस्फोट त्यांच्या आरंभीच्या कवितांतून झालेला दिसत असला तरी पुढे त्यांची कविता अधिकाधिक समाजसन्मुख झालेली आहे. कामगार, दलित, झोपडपट्टीत राहणारे लोक यांच्या जीवनातील बऱ्या-वाईट गोष्टींची अनुभूती कविने प्रत्यक्ष घेलेली असल्यामुळे त्यांची कविता अत्यंत जिवंत रसरशीत बनलेली आहे. हा कवी मनुजवैरी समाजव्यवस्थेचा, तीव्र शब्दात निषेध करतो.

कविवर्य कुसुमाग्रज 'ऐसा मी ब्रह्म' या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात, " श्री. नारायण सुर्वे हे कामगार जीवनाशी केवळ समरस झालेले नव्हते तर ते जीवन प्रत्यक्षात अनुभविणारे कवी आहेत. सभोतालच्या परिसरात काही श्रद्धा जागत्या ठेऊन ते जगत आहेत. आणि त्यातून त्यांनी आपल्या काव्याचा शोध घेतलेला आहे. त्यांची बरीचशी कविता लढाऊ वृत्तीची, समाजक्रांतीची उपासना करणारी, नव्या आनंदवनभुवनाचे स्वप्न पाहणारी आहे. प्रामाणिकपणा आणि उत्कटता ही सत्काव्याची आधारतत्त्वे होत. सुर्वे यांच्याजवळ या दोन गोष्टी आहेत.

डॉ. ललिता कुंभोजकर म्हणतात, " मराठी कवितेत मर्ढेकरांच्या नंतर एक महत्त्वाचे पर्व उलगडते ते नारायण सुर्वे यांच्या कवितेचे होय."[३] नारायण सुर्वे ह्यांच्या कवितेकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. इतके महत्त्व नारायण सुर्वे ह्यांच्या कवितेने मिळविले आहे. मराठी नवकाव्यामध्ये बा.सी. मर्ढेकरांनी मानवी जीवनाचे भकास रुप, यंत्रयुगामुळे आलेली त्रुटीता, खंडीतता, विज्ञान युगातील मनुष्याचे क्षुद्र अस्तित्व आणि भयान एकाकीपण यांचे दर्शन आपल्या कवितेतून प्रथम घडविले आहे. मात्र नारायण सुर्वे यांनी त्यापुढे जाऊन मराठी कवितेमध्ये ज्या स्वतःच्या दुनियेचे दर्शन घडविले ते दर्शन रोखठोख, अस्सल आणि प्रामाणिक होते.

नारायण सुर्वे ह्यांच्या पूर्वसुरींनी तसे दर्शन घडविले नव्हते. मर्ढेकरांनी जे दर्शन घडविले ते रोकड्या स्वरुपाचे असले तरी ते ह्याही पुढे जाणारी कविता सुर्वेंनी लिहिली. माणसाच्या जीवनात असलेली दारिद्र्याची, भाकरीची आग प्रचंड होती आणि या आगीच्या धगधगत्या वास्तवातून या कवीचे जीवन बाहेर आलेले होते. या जीवनामध्ये असलेला संघर्ष, अन्याय, विषमता, पिळवणूक यांमुळे हादरलेले कवीचे मन त्यांच्या कवितेतून बोलके होत गेले आहे. अनेक व्यथांचे चित्रण हा सुर्वे यांच्या कवितांचा विषय आहे. पण अपूर्व हे की, व्यथांचे चित्रण असूनही त्यांची कविता कुठेही नैराश्यपूर्ण, दुबळी किंवा अगतिक झालेली दिसत नाही. पराभवाच्या कसोटीचे अनेक क्षण जीवनात आले पण त्यातून बाहेर पडण्याची उमेद त्या क्षणाला जिंकण्याची जिद्द आणि जीवनाचा घेतलेला रोखठोख अनुभव आपल्याला जाणवतो.

नारायण सुर्वेंनी कविता लिहिली ती जीवनाच्या विद्यापीठामध्ये जी माणसे त्यांना अनुभवाला आली आणि त्यांच्या मनाच्या शाळेत घर करुन राहिली तीच माणसे त्यांना कविता लिहिण्यास प्रवृत्त केली आहेत असे म्हणता येईल. जीवनाच्या विशाल वाटेवर भेटलेली माणसे व त्यांचे ऐकलेले नि स्वतः अनुभवलेले जीवन म्हणजे एक त्यांचे विद्यापीठच होय. या जीवनाच्या विद्यापीठात सुर्वेंना अनेक रंगाची, अनेक चेहरे असलेली, भाकरीसाठी करपलेली, कोळपलेली अनेक जीवने पाहिली आणि आपल्या कवितेतून व्यक्त केली. एकूणच नारायण सुर्वेंची कविता ही माणुसकीची कळ जपणारी आहे. असे म्हणता येईल. जगणे व्यक्त करणारी कविता एका नव्या तुफानाची, नव्या युगाची जाणीव करुन देणारी आहे.

कविने व्यक्त केलेली वेदना केवळ त्यांची एकट्याची नाही तर जागतिक स्वरुपाचे रुप धारण करणारी आहे. ते एका कवितेत म्हणतात,

**"एकटाच आलो नाही, युगाचीही साथ आहे**

**सावध असा तुफानाची, हीच खरी सुरुवात आहे."** 'माझे विद्यापीठ'च्या प्रस्तावनेत कुसुमाग्रज म्हणतात- सुर्वे ह्यांचे काव्य कामगार जीवनातून आले आहे, याचे महत्त्व मला एवढ्यासाठी वाटते की, अनुभवाच्या एका वेगळ्या प्रांताचे नितळ दर्शन वाचक म्हणून मला या काव्यामध्ये होते. या संदर्भात दोन गोष्टी जाणवतात. ही कविता कवीच्या जीवनाविषयी अनुभवांशी आणि श्रद्धेसी प्रामाणिकपणे बांधलेली आहे.... तिला स्वभावतः एक प्रतिज्ञा आहे. कमिटमेंट आहे. दुसरी गोष्ट अशी की, हे सर्व करण्याची तिच्यामध्ये कुवत आहे. म्हणजे ती प्रत्ययकारी आहे.

नरहरी कुरुंदकर म्हणतात- सुर्वेंची कविता भूकेच्या शमनार्थ भीक मागणारी कविता नाही. तर भूकेचे गाठोडे खांद्यावर टाकून ते वाहत नेताना तिथेही आत्म्याशी बेइमान न होता, माणुसकीची कळ जपणारी आहे. व्यथा हे या कवितेचे मुख्य स्वरुप आहे आणि व्यथेच्या भट्टीत शेकून घेऊनही शिल्लक राहिलेला माणूस कवितेचा विषय आहे. आधुनिक मराठी कवितेत रचनेच्या दृष्टीने, सुर्वे यांच्या इतकी साधी कविता इतर कोणत्याही कवीची नाही.

तर डॉ. अनुराधा पोतदार यांना नारायण सुर्वेंची कविता संवादमयी वाटते. 'फाटके नेसून मधुघट जोपासन्याचे तिचे जे बळ आहे, भागो नही बदलो अशी घोषणा देणारी त्यांची कविता असे कुंभोजकरांना वाटते. त्याच पुढे म्हणतात, आमची दुनिया वेगळीच असे सांगणारी, लढाऊ वृत्तीची, सामाजिक क्रांतीचे स्वप्न पाहणारी आणि त्यातूनही पलीकडे जाऊन एका नव्या जीवनाला सामोरे जाण्याची जिद्द असणरी, अशीच कविता आहे.[४] 'माझे विद्यापीठ' काव्यसंग्रहातील

कवितामधील जाणिवांचा विस्तार झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. स्वतः अलिप्त राहून आत्मपरीक्षण करून स्वतःला जाणवलेल्या सत्याचे रूप दाखवीत असते.

मध्यम वर्गाच्या पलीकडे, हादरवून टाकणारे जग, प्रथमच चित्रित केले. अनुभवाला सरळ सामोरे जाण्याची त्यांची रीतही त्यांची विलक्षण जिवंत स्वरूपाची आणि त्या अनुभवातील अस्सलपणा व्यक्त करणारी आहे. अनेकदा भावनोत्कट क्षणीसुद्धा ती स्वतः भावविवश होत नाही. या कवितेचा केंद्रबिंदू 'माणूस' आहे. हा माणूस देशातला, मातीतला, अगदी तळागाळाचा आहे. या सामान्य माणसाच्या पिळवटल्या जाणाऱ्या, शोषल्या जाणाऱ्याच्या वेदनेची ही कहाणी आहे. क्रांती, कामगार, यंत्र असे शब्द यात असले तरी 'माणूस' हा तिचा संदर्भ महत्वाचा आहे.

नारायण सुर्वे यांची कविता अशी मानवी जीवनातील ब्रह्म शोधणारी आहे. जीवनाच्या विद्यापीठात कष्टाची लिपी शिकून, मनाची उभारी आणि जगण्याची जिद्द टिकविणारी आहे. नव्या युगाचा जाहिरनामा मुक्तकंठाने गर्जणारी आहे. सामान्यातील सामान्य माणसाच्या हाती हक्काने जगण्याची सनद देणारी आहे. तसेच मानव्याचे भान ठेवावयास आवाहन करणारी आहे.

## संदर्भः

१. पाध्ये दिगंबर, (आधुनिक मराठी कवितेचे तिसरे वळण') प्रस्तावना सुर्वे, नारायण सुर्वे यांच्या समग्र कविता', पॉप्युलर प्रकाशन, मुबंई, आ. पहिली. पृ. ३५.

२. काळे अक्षयकुमार (डॉ.), 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन', पां.ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर-१२, प्रथमावृत्ती- १९९९. पृ.६११.

३. तत्रैव

४. कुसुमाग्रज (संपा.),'निवडक नारायण सुर्वे', पॉप्युलर प्रकाशन, मुबंई.